सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

https://epaper.globalmahatej.com/

वर्ष १ ले | अंक : १६३ | शुक्रवार, दि. ६ मार्च २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com




श्री. भरत पाटील
कार्यकारी संपादक







अमळनेर : पहिल्या व दुसऱ्या छायाचित्रात पैलाड परिसरातील तुंबलेल्या गटारींची साफसफाई करताना पालिकेचे कर्मचारी. शेवटच्या छायाचित्रात जेसीबीद्वारे तोडण्यात येत असलेली काटेरी झाडे– झुडपे.

(छायाचित्रे : रजनीकांत पाटील)

### दै. ग्लोबल महातेजच्या बातमीचा दणका!

# अखेर पालिका प्रशासनास आली जाग..!

## पैलाड परिसरात स्वच्छता मोहिमेस वेग...!!

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

**अमळनेर : येथील पैलाड परिसरातील अस्वच्छता व समस्यांबाबत दै. ग्लोबल महातेजने गुरुवार, दि. ५ मार्च रोजी 'उघड्या गटारी, कचऱ्याचे ढीग, सांडपाणी आणि दुर्गंधीचा कहर; भग्न स्वच्छतागृह, बंद दवाखाना' या शिर्षक व 'पैलाड भागातील नागरिकांच्या संतप्त भावना : आम्ही खरोखर अमळनेरचे करदाते नागरिक आहोत का?' या उपशिर्षकाखाली वाचा फोडली आहे. या वृत्ताची पालिकेने तत्काळ दखल घेतली आहे. पालिका प्रशासनाने गुरुवारी सकाळपासून पैलाड परिसरात युद्धपातळीवर स्वच्छता मोहिमेस सुरूवात केली आहे. दै. ग्लोबल महातेजच्या दणक्याने न्याय मिळाल्याच्या भावना पैलाड परिसरातील नागरिकांनी व्यक्त केल्या आहेत.**

पैलाड भागातील पांढरी परिसरात जेसीबीच्या सहाय्याने मातीचे ढिगारे, उकिरडे साचलेला कचरा हटवून परिसराची स्वच्छता होत आहे. नालेसफाईलाही वेग आला आहे. अनेक दिवसांपासून कचरा, गाळ व प्लास्टिकने तुंबलेल्या गटारींचा निचरा करण्याचे काम सुरू आहे. अमळनेर– पारोळा रस्त्यावरील मुख्य गटारींचीही साफसफाई सुरू करण्यात आली आहे. जेसीबीच्या सहाय्याने गटारीतील गाळ काढणे, तसेच गटारीच्या काठावरील वाढलेली झाडे व काटेरी झुडपे हटविण्याचे काम सुरू आहे. त्यामुळे परिसरातील दुर्गंधी व अस्वच्छतेची समस्या सुटणार आहे.

पालिकेच्या अधिकाऱ्यांनी सांगितले, की पैलाड परिसरात स्वच्छता मोहिम राबविण्यात येत आहे. आठवडाभरात परिसर चकाचक करण्याचे नियोजन आहे. उर्वरित भागातही टप्प्या- टप्प्याने स्वच्छता मोहीम राबविण्यात येईल. मुकादम सोमनाथ संदानशिव, खुशाल पवार, गौरव सोनवणे, राज वाघ व अनेक कर्मचारी या मोहिमेत सहभागी झाले आहेत.

**'दै. ग्लोबल महातेज'च्या बातमीचे सर्वत्र कौतुक होत आहे. बातमीमुळे न्याय मिळाल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे. ही स्वच्छता मोहिम काही दिवसांपुरता मर्यादित न राहता कायमस्वरूपी राबविण्यात यावी, अशी मागणीही नागरिकांनी केली आहे.**



## वावडे, शिरुड मंडळात शनिवार, रविवार समाधान शिबिर

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : ग्रामीण भागातील नागरिकांच्या दैनंदिन समस्या व तक्रारींचे निराकरण करण्यासाठी महसूल विभागामार्फत 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर' अभियानांतर्गत वावडे व शिरूड मंडळ स्तरावर समाधान शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. शिरूड मंडळात शनिवार, दि. ७ मार्च रोजी सकाळी १० ते सायंकाळी ४ या वेळेत शिवनाथ बाबा देवस्थान सभागृह, फाफोरे बुद्रुक येथे होणार आहे. शिरूड मंडळात शिरूड, इंद्रापिंप्री, कावपिंप्री, फाफोरे बु., फाफोरे बु. वन, हिंगोणे खु., लोंढवे, निसर्डी, वाघोदा, रणाईचे बु., रणाईचे खु., अंचलवाडी, डांगर बु., कोंढावळ, चोपडाई, जानवे आदी गावांचा यात समावेश आहे. वावडे मंडळाचे शिबीर रविवार, दि. ८ मार्च रोजी सकाळी १० ते सायंकाळी ४ या वेळेत उदय माध्यमिक विद्यालय, झाडी, ता. अमळनेर येथे होणार आहे. वावडे मंडळातील वावडे, तरवाडे, लोण बु., लोण खु., लोणचारम, लोण सिम, जवखेडा, मांडळ, शिरसाळे बु., शिरसाळे खु., झाडी, ढेकू चारम, आर्डी, खडके, आनोरे, पिंपळे बु., चिमणपूरी, पिंपळे खु., अटाळे या गावांचा समावेश आहे. शिबिरास येताना संबंधित तक्रारींची आवश्यक कागदपत्रे सोबत आणावीत. ग्रामस्थांनी, या शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

## ट्रिपल सीटवर पोलिसांची नजर; चोवीस वाहनधारकांवर कारवाई

### २९ हजार ९०० रुपयांचा दंड वसूल

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : येथील वाढती वाहतूक कोंडी, अपघातांची शक्यता आणि वाहतूक नियमांचे उल्लंघन रोखण्यासाठी अमळनेर पोलिसांच्या वाहतूक शाखेकडून विशेष मोहीम राबविण्यात आली. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ट्रिपल सीट असलेल्या २४ वाहनधारकांवर गुरुवार, दि. ५ मार्च रोजी कारवाई करण्यात आली आहे. त्यांच्याकडून एकूण २९ हजार ९०० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे.



ही कारवाई प्रताप महाविद्यालय परिसर, स्वामी समर्थ प्रवेशद्वार, महाराणा प्रताप चौक, स्टेशन रोड परिसरात करण्यात आली. वाहनधारकांकडे लायन्स नसणे, सुसाट वाहन चालवणे, ट्रिपल सीट, विना नंबरची वाहने चालवणे तसेच रस्त्यावर वाहन पार्क करणे अशा विविध नियमभंग करणाऱ्या वाहनचालकांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली.

याशिवाय काही ठिकाणी अल्पवयीन शालेय तरुण– तरुणी दुचाकी वेगाने चालवत असल्याचेही निर्दशनास आले. त्यांच्याकडूनही दंड वसूल करण्यात आला आहे. वाहतूक नियमांचे पालन करण्याबाबत सूचना देण्यात आल्या.

या कारवाईत पोलीस उपनिरीक्षक कविता खानगे, नम्रता जरे, शामल पारधी यांच्यासह वाहतूक शाखेचे विलास बागुल, संजय बोरसे, रवींद्र बोरसे यांचा सहभाग होता.

वाहतूक शाखेकडून नागरिकांना हेल्मेटचा वापर करणे, आवश्यक कागदपत्रे सोबत ठेवणे आणि वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करणे, असे आवाहन करण्यात आले आहे. शिस्तबद्ध वाहतूक राखण्यासाठी अशा प्रकारच्या कारवाया पुढेही नियमितपणे सुरू राहणार असल्याचे पोलिसांनी सांगितले.

### गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा–जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा–तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!! जय भारत...! जय स्वदेशी...!!

### दिनविशेष

०६ मार्च

- गझल गायक जगजितसिंग यांना मध्य प्रदेश सरकारतर्फे लता मंगेशकर पुरस्कार जाहीर झाला.
- राष्ट्रपती के. आर. नारायण यांच्या हस्ते जगप्रसिध्द खजुराहो मंदिर समूहाच्या सहस्त्राब्दी सोहळ्याचे उद्घाटन झाले.
- देशातील पहिला अणुउर्जा प्रकल्प तारापुत येथे सुरु झाला

**मनशांती हवीय? आहारात 'हे' छोटे बदल करा, फरक अनुभवा**

पान ३ वर

## पारा ४० अंशांवर जाण्याची शक्यता

### उच्च दाबाच्या हवेचा पट्टा तयार झाल्याचा परिणाम

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : पश्चिमेकडील उच्च दाबाच्या हवेचा पट्टा उष्ण हवेची चक्राकार स्थिती होऊन मार्चच्या पहिल्या पंधरवड्यातच शहराचा पारा ४० अंशांवर जाण्याची शक्यता आहे. उत्तर भारतातील वेस्टर्न डिस्टर्बन्स कमकुवत तर पश्चिम भारतावर उच्च दाबाचा हवेचा पट्टा मजबूत होत आहे. त्यामुळे हवा दाबली जाते आणि गरम होते. ही उष्ण हवा राजस्थान आणि गुजरातमार्गे महाराष्ट्रात प्रवेश करत असल्याने उष्णतेची लाट जाणवू शकते, अशी माहिती हवामान अभ्यासक नीलेश गोरे यांनी दिली.

**उष्णता का अडकून राहतेय?**

पश्चिम भारतात उष्ण हवेची एक




गोलाकार स्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे निर्माण झालेली उष्णता बाहेर न पडता त्याच भागात अडकून राहते. परिणामी जमिनीलगतच्या तापमानात झपाट्याने वाढ होत आहे.

**गुरुवारपासून तापमानात वाढ**

होण्यास सुरुवात होईल. ५ ते १५ मार्च दरम्यान जिल्ह्याचा पारा ४० अंशांपर्यंत जाण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे नागरिकांनी दुपारच्या वेळी घराबाहेर पडणे टाळावे, उष्माघातापासून बचाव करण्यासाठी योग्य ती खबरदारी घ्यावी, असे आवाहन तज्ज्ञांनी केले आहे.

## जोपर्यंत जिवंत आहे, तोपर्यंत जनतेसाठी काम करणार !

### खासदार स्मिताताई वाघ : उपचार सुरू असतानाही कामास प्राधान्य

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : एका गंभीर आजारचे निदान झाल्यानंतरही संसदेतील कामकाजात सक्रिय राहण्याचा निर्धार भाजपच्या खासदार स्मिताताई वाघ यांनी व्यक्त केला आहे. आपल्या मतदारसंघातील प्रश्न संसदेत मांडणे आणि त्यावर उपाययोजना करणे, हेच आपले प्रमुख कर्तव्य असल्याचे त्यांनी सांगितले आहे.

दिवाळीच्या सुमारास शरीरात काहीतरी वेगळे जाणवू लागल्याने त्यांनी कुटुंबीय डॉक्टरांचा सल्ला घेतला. त्यावेळी मॅमोग्राफी तपासणी करण्यात आली. त्यातून गंभीर आजाराचे निदान झाले. त्यानंतर त्यांनी तत्काळ मुंबई येथे जाऊन शस्त्रक्रिया केली. शस्त्रक्रिया तुलनेने कमी वेदनादायी असली तरी त्यानंतर डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार पुन्हा उपचार घ्यावे लागले. जे अत्यंत वेदनादायी असल्याचे त्यांनी सांगितले. मात्र, याबाबत त्यांनी सकारात्मक दृष्टिकोन व्यक्त केला. नशिबात जे असेल ते होणारच. प्रत्येक गोष्ट आपल्या नियंत्रणात नसते. जे काही प्रसंग येतील, त्यांना धैर्याने आणि सकारात्मकतेने सामोरे जायला हवे. काम करत राहिल्यावर मला आनंद मिळतो, असे त्यांनी सांगितले.

राजकारणातील दीर्घ प्रवास आठवत त्यांनी सांगितले, की विद्यार्थी जीवनात अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेपासून सुरू झालेली सार्वजनिक जीवनातील वाटचाल कधीच थांबलेली नाही. मी घरी बसून राहणारी व्यक्ती नाही. जितके आपण कामात व्यस्त राहतो, तितकी अडचणींना सामोरे जाण्याची ताकद वाढते. जनतेने मला नेहमीच बळ दिले आहे. तीच माझ्या आयुष्याचा पाया आहे, असे त्यांनी सांगितले. संसदेतील उपस्थितीबाबत त्यांनी स्पष्ट केले, की संसद हे मतदारसंघातील प्रश्न मांडण्यासाठी आणि त्यावर तोडगा काढण्यासाठी सर्वात प्रभावी व्यासपीठ आहे. म्हणूनच मी अधिवेशन चुकवू शकत नव्हते. माझ्या मतदारसंघाच्या प्रश्नांसाठी मी उपस्थित राहणे आवश्यक आहे. अर्थसंकल्पीय अधिवेशनाबाबत बोलताना त्यांनी सांगितले की, यावेळचा अर्थसंकल्प महिला, शेतकरी आणि स्टार्टअप्ससाठी अनेक तरतुदींनी यक्त आहे. त्यामुळे मतदारसंघाच्या विकासकामांना अधिक गती देता येईल. सोमवार, दि. ९ मार्चपासून सुरू होणाऱ्या पुढील अधिवेशनालाही उपस्थित राहणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. १५ मार्च रोजी उपचाराचे नियोजित असले तरी, या गोष्टी आयुष्यात चालूच राहतात. मी कधीही पराभव स्वीकारलेला नाही. जोपर्यंत जिवंत आहे, तोपर्यंत माझ्या जनतेसाठी आणि देशासाठी काम करत राहीन. उपचाराच्या सुरुवातीच्या टप्प्यात विश्रांती घ्यावी, असा वैद्यकीय सल्ला असूनही त्या संसदेतील कामकाजात त्या सक्रिय राहिल्या. गेल्या काही दिवसांत त्यांनी चर्चांमध्ये सहभाग घेतला. प्रश्न विचारले आणि विशेषतः ग्रामीण विकास, आरोग्य सुविधा व कल्याणकारी योजनांबाबतचे मुद्दे प्रभावीपणे मांडले. सहकारी सदस्यांनीही उपचार आणि संसदीय कामकाज यांचा समतोल साधत त्यांनी नियमित उपस्थिती राखल्याचेही सांगितले.



## संपादकीय

# आव्हान आहेच; पण क्षमताही!

राज्याच्या उपमुख्यमंत्रिपदापाठोपाठ आता राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून सुनेत्राताई पवार यांनी सूत्रे हाती घेतली आहेत. हे दोन्ही निर्णय लोकांना अपेक्षितच होते. सुनेत्राताईंच्या पाठी राजकारणाचा माहेर आणि सासरचा वारसा आहे. सामान्य कार्यकर्त्यांचादेखील त्यांना पाठिंबा असल्याचे चित्र आहे. तथापि, त्यांच्या पक्षातील आणि इतरही अनेक राजकीय धुरंधर मात्र ताई सक्रिय राजकारणात नवख्या असल्याचे मानतात. कुरापती काढण्यातही असे धुरंधर माहिर असतात. मात्र, अजितदादा पवार यांच्याइतक्याच खमकेपणाने राज्य आणि पक्ष दोन्ही सांभाळू शकते, हे सुनेत्राताईंना सिद्ध करावे लागणार आहे आणि तेच मोठे आव्हान असू शकेल. त्याची चुणूक पत्रकार परिषदेने त्यांना दाखवून दिली असावी. राष्ट्रीय अध्यक्षपदी निवडीनंतर त्यांची पहिलीच पत्रकार झाली.

अध्यक्ष म्हणून त्या संवाद साधतील ही माध्यमांची अपेक्षा पुरती फोल ठरली. त्यांच्या संवादाशिवायच पत्रकार परिषद संपवली गेली. ताईंची मन:स्थिती ठीक नाही, असे माध्यम प्रतिनिधींना सांगितले जात होते, असे माध्यमांत प्रसिद्ध झालेल्या वृत्तात म्हटले आहे. त्यांच्याच पक्षातील काही नेत्यांनी त्यांना बोलू दिले नाही, असाही याचा एक अर्थ काढला गेला. आमदार सरोज आहिरे यांचा दावा त्या अथार्ची पुष्टी करणारा ठरू शकेल. कार्यकर्त्यांना अजितदादा पवारांपासून दूर ठेवले जात होते. सुनेत्राताईंच्या काळात तरी असे घडू नये, अशा भावना त्यांनी माध्यमांकडे व्यक्त केल्या. भविष्यात असे अनेक दावे–प्रतिदावे, कुरघोड्या आणि एकमेकांची उणीदुणी ताईसमोर येतील. त्यातील राजकारण ओळखून वागण्याचे कसब त्यांना दाखवावे लागेल.

अजितदादा पवार यांच्या धक्कादायक निधनानंतर पक्षावर ताबा मिळविण्याच्या दोन्ही राष्ट्रवादी पक्षांमधील अनेकांच्या महत्त्वाकांक्षांना पंख फुटलेले जनतेने पाहिले. अनेकांचे तसे प्रयत्न जनतेपासून लपून राहिलेले नव्हते. अपघाताच्या दुर्दैवी घटनेनंतर पहिल्या काही तासांतच पडद्यामागच्या हालचालींनी कमालीचा वेग घेतल्याचे नंतर जनतेसमोर आले होते. अजितदादा पवारांच्या राष्ट्रवादी पक्षाच्या संभाव्य अध्यक्षपदाच्या नावाची एक शक्यता व्यक्त केली म्हणून खुलासा करण्याची वेळ भाजपचे ज्येष्ठ नेते पीयूष गोयल यांच्यावर आली होती. आता ती सूत्रे ताईंकडे सोपविली गेली आहेत. तेव्हा त्यांच्या राजकारणातील नवखेपणाचा बाऊ करून पक्षावर नियंत्रण मिळविण्याची महत्त्वाकांक्षा काहीअंशी तरी साध्य केली जाऊ शकेल, अशा हालचाली पक्षांतर्गत यापुढेही होण्याची शक्यता नाकारली जाऊ शकणार नाही.

# ‘प्रताप’च्या विद्यार्थ्यांनी केला स्थापत्य कलेचा अभ्यास

## इतिहास विभागाचे आयोजन; उदयपूर, चितोडगड, मांडवगड येथे ऐतिहासिक स्थळांना भेट

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील प्रताप महाविद्यालयातील इतिहास विभागातील विद्यार्थ्यांनी उदयपूर, चितोडगड, धार, मांडवगड, बाग लेणी येथे दिनांक २२, २३ आणि २४ फेब्रुवारी रोजी भेट दिली. राजस्थानी परंपरा व स्थापत्य कलेची विद्यार्थ्यांनी माहिती जाणून घेतली. केवळ दैनंदिन पाठ्यपुस्तकाचा अभ्यास न करता प्रत्यक्ष अनुभवातून देखील अभ्यास केला पाहिजे ही जाणीव विद्यार्थ्यांमध्ये उपलब्ध होण्याच्या दृष्टीने हा अभ्यासदौरा होता. प्राचीन भारतीय कला व स्थापत्य कलेचे सूक्ष्म निरीक्षण विद्यार्थ्यांनी केले.

२२ फेब्रुवारी रोजी विद्यार्थी उदयपूर येथे पोहोचले. उदयपूर येथील उदयपूर पॅलेस हे स्थापत्यशास्त्राच्या दृष्टिकोनातून अत्यंत महत्त्वपूर्ण ठिकाण विद्यार्थ्यांनी पाहिले. त्याचा अभ्यास विद्यार्थ्यांनी करून त्याविषयी



उदयपूर (राजस्थान) : ऐतिहासिक स्थळाच्या अभ्यासदौऱ्याप्रसंगी उपस्थित इतिहास विभागाच्या विद्यार्थिनी. शेजारी प्राध्यापक, प्राध्यापिका आदी.

सविस्तर माहिती घेतली. यानंतर विद्यार्थ्यांनी उदयपूर येथील जल व्यवस्थापनाच्या दृष्टिकोनातून अत्यंत उपयुक्त असलेली व्यवस्था पिचोला तलाव बघून अभ्यासाच्या दृष्टिकोनातून आणि जलव्यवस्थापनाच्या दृष्टिकोनातून महत्वपूर्ण माहिती घेतली. त्यानंतर उदयपूर येथील सहेलीयो की बारी या ठिकाणाला भेट देऊन विविध वनस्पती आणि त्या ठिकाणी असलेले सुशोभित करणारे कारंजे आणि स्थापत्य इमारती यांची माहिती घेतली.

२३ फेब्रुवारी रोजी चितोडगड या स्थापत्यशास्त्राच्या दृष्टिकोनातून अद्भूत असलेल्या किल्ल्याला त्यांनी भेट दिली. किल्ल्यावरील स्मारके, मंदिरे, आणि स्तंभ यांच्याविषयी सविस्तर माहिती घेऊन सामरीक दृष्टिकोनातून किल्ल्याचे महत्त्व जाणून घेतले. त्यानंतर त्याच दिवशी प्राचीन ऐतिहासिक मंदिर असलेल्या पशुपतिनाथ महादेव मंदिराला भेट देऊन प्राचीन स्थापत्यातील नागर शैलीच्या मंदिराविषयी सविस्तर माहिती घेतली.

२४ फेब्रुवारी रोजी विद्यार्थ्यांनी मांडवगड या मध्ययुगीन भारतातील इंडो इस्लामिक शैलीच्या स्थापत्याचा अभ्यास करण्याकरिता अनेक महत्त्वपूर्ण नोंदी घेतल्या. त्यामधील शहराच्या बाहेरील बाजूस असलेले दरवाजे, जहाज महाल, राणी रूपमतीचा महाल, बहादूर महाल, आणि होशंग शाहचा मकबरा, जामा मशीद या ठिकाणांना भेट देऊन मध्ययुगीन भारतीय स्थापत्य कलेचा उदय आणि विकास यांचा सविस्तर माहिती घेतली.


त्यानंतर विद्यार्थ्यांनी प्राचीन भारताच्या स्थापत्याचे एक उत्तम उदाहरण असलेल्या बाग या लेणीला भेट दिली. या लेणीतील सुंदर रंगीत चित्रे, त्या चित्रांमध्ये असलेल्या जातक कथा आणि जातक कथेद्वारे बुद्धाचे जीवन चरित्र रंगवण्याचा कलाकारांचा प्रयत्न विद्यार्थ्यांनी जाणून घेतला. या अभ्यासदौऱ्यासाठी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. हर्षवर्धन जाधव, डॉ. मुकेश भोळे व इतिहास विभागप्रमुख डॉ. धनंजय चौधरी यांनी प्रोत्साहन दिले. इतिहास विभागाचे प्रा. विजय साळुंखे यांनी नियोजन केले. प्रा. डॉ. प्रियाका पाटील यांनी सहकार्य केले.

# राष्ट्रीय विज्ञान दिननिमित्त सूक्ष्मजीवशास्त्र विद्यार्थ्यांचे संशोधनात्मक सादरीकरण!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त प्रताप महाविद्यालयातील सूक्ष्म जीवशास्त्र एम.एस्सी.च्या विद्यार्थ्यांनी विविध वैज्ञानिक व त्यांनी केलेले समाजोपयोगी संशोधनाचे कार्य केले. उल्लेखनीय संशोधन करुनही ज्यांच्या कार्याची दखल कधी घेतली गेली नाही, अशा दूर्लक्षित असलेल्या वैज्ञानिकांच्या संशोधन कार्याचे सादरीकरण केले.

भूषण सोनवणे, सायमा तेली, दिव्या वडनेरे, मोहिनी वारुडे,




लीना चौधरी यांनी इतिहासात कधीही समाजासमोर ज्यांच्या संशोधनाची दखल घेतली गेली नाही अशा महिला वैज्ञानिक रॉबर्ट कोच, डॉ. विभा चौधरी, सेलमन वॅक्समन व अलेक्झांडर फ्लेमिंग या वैज्ञानिकांचे संशोधनात्मक कार्य व त्याचा समाजासाठी झालेला उपयोग याविषयी पॉवर पॉइंट प्रेझेंटेशन सादर केले.

याप्रसंगी विभागप्रमुख प्रा. एस. ए. जोशी यांनी विद्यार्थ्यांना स्टार्ट अपच्या नाविन्यपूर्ण प्रकारांबद्दल मार्गदर्शन केले. सायमा तेली या विद्यार्थिनीने कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. प्रा. हेमलता सूर्यवंशी- भोसले यांनी समारोपपर मार्गदर्शन केले. यावेळी विभागातील प्रा. वैशाली महाजन, प्रा. भावना महाजन, प्रा. नेहा महाजन, प्रा. ममता महाजन, प्रा. कल्याणी पाटील, प्रा. औक्षणी साळुंखे व प्रा. दिव्या महाजन व पदवी- पदव्युत्तर वर्गाचे विद्यार्थी उपस्थित होते.

## शिक्षण प्रसारक मंडळाच्या उपाध्यक्षपदी राधेश्याम अग्रवाल यांची निवड

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



अमळनेर : येथील बजरंगलाल अग्रवाल यांचे पूत्र सीए राधेश्याम बजरंगलाल अग्रवाल यांची पुणे येथील ख्यातनाम शिक्षण प्रसारक मंडळाच्या उपाध्यक्षपदी नुकतीच निवड करण्यात आली आहे. त्यांच्या निवडीबद्दल सर्वत्र कौतुक होत आहे.

या संस्थेंतर्गत एस. पी. कॉलेज (पुणे), रामनारायण रुईया महाविद्यालय (मुंबई), रा. मा. पोद्दार महाविद्यालय (मुंबई), वेलिंगकर इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट (मुंबई) तसेच इतर १६ शिक्षण शाखा आहेत. अमळनेरचा भूमिपुत्राची पुण्याच्या ख्यातनाम संस्था शिक्षण प्रसारक मंडळाच्या उपाध्यक्षपदी निवड होणे ही अमळनेरकरांसाठी अभिमानाची बाब आहे.


# खान्देशात विद्रोही विचारांची हाक!

## शाहीर संभाजी भगत यांचा सोमवारी अमळनेरात सत्कार

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : विद्रोही सांस्कृतिक चळवळ (महाराष्ट्र) यांच्यातर्फे १५वे विद्रोही साहित्य संमेलन २ व ३ मे रोजी सातारा येथे होणार आहे. या संमेलनाच्या पार्श्वभूमीवर संमेलनाध्यक्ष तथा प्रख्यात शाहीर संभाजी भगत खान्देश दौऱ्यावर येत आहे. सोमवार दि. ९ मार्च रोजी ते अमळनेर येथे भेट देणार आहेत. यानिमित्त त्यांचा सत्कार होणार असून, ते संवाद साधणार आहे.

समाजातील अन्याय, विषमता आणि असमानतेविरुद्ध आपल्या जाज्वल्य वाणीने आवाज उठवणारे शाहीर संभाजी भगत हे परिवर्तनवादी विचारांचे सशक्त प्रतिनिधी मानले जातात. त्यांच्या उपस्थितीत अमळनेर येथे ९ मार्च रोजी सकाळी ११ वाजता



मराठी वाङ्मंडळाच्या नांदेडकर सभागृहात सत्कार व मुक्त संवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या दौऱ्यादरम्यान शाहीर भगत साने गुरुजी कर्मभूमी स्मारक परिसरास भेट देणार आहेत. साने गुरुजींच्या मानवतावादी, समानतावादी आणि संविधाननिष्ठ विचारांना अभिवादन करणार आहेत. अमळनेर ही साने गुरुजींची कर्मभूमी असल्याने या भेटीला विशेष ऐतिहासिक व सांस्कृतिक महत्त्व प्राप्त झाले आहे. अमळनेर परिसरातील समानता, मानवता, अहिंसा आणि भारतीय संविधानाच्या मूल्यांवर विश्वास ठेवणाऱ्या सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक संस्था, संघटना तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांतर्फे हा सत्कार सोहळा होणार आहे. कार्यक्रमात विद्रोही साहित्य चळवळीचे उद्दिष्ट, सामाजिक परिवर्तनातील साहित्याची भूमिका आणि वर्तमान काळातील सांस्कृतिक आव्हाने यावर शाहीर संभाजी भगत संवाद साधतील. अमळनेर व परिसरातील नागरिक, साहित्यप्रेमी, तरुण व विविध संघटनांच्या प्रतिनिधींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन साने गुरुजी कर्मभूमी स्मारक प्रतिष्ठान व साने गुरुजी विद्यालयातर्फे करण्यात आले आहे.

# अमळनेर येथे विज्ञान प्रश्नमंजुषा स्पर्धा उत्साहात

## यशवंत क्लासेसचा उपक्रम; विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाविषयी गोडी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील प्रतिमा वैद्य यांच्या यशवंत क्लासेसमध्ये कोण बनेल यशवंत ? या विज्ञान विषयक प्रश्नमंजुषा स्पर्धा घेण्यात आले. विज्ञानविषयाची गोडी विद्यार्थ्यांमध्ये वाढावी व त्यांची बौद्धिक क्षमता विकसित व्हावी या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.

विज्ञान मंडळाचे अध्यक्ष निरजन पेंढारे अध्यक्षस्थानी होते. पी. बी. ए. इग्रजी विद्यालयाचे मुख्याध्यापक जिजाबराव देवरे, निवृत्त प्राध्यापक ललित मोमाया प्रमुख पाहुणे होते. गणित मडळाचे अध्यक्ष डी. ए. धनगर प्रमुख वक्ते होते. विज्ञान विषय केवळ पाठातरापुरता मर्यादित न ठेवता प्रयोगशील दृष्टिकोनातून शिकण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले. दोन दिवस चाललेल्या या स्पर्धा तीन फेऱ्यांमध्ये घेण्यात आल्या. पहिल्या दिवशी प्राथमिक व उपांत्य फेरी पार पडली. दुसऱ्या फेरीत प्रत्येकी तीन विद्यार्थ्यांचे संघ तयार करून त्यांना वैज्ञानिक संकल्पनांवर आधारित नावे देण्यात आली. दिवसभर चाललेल्या प्रश्नोत्तराच्या सत्रात विद्यार्थ्यांनी चातुर्य, वेगवान विचारशक्ती व अचूक उत्तरे देत उपस्थितांची दाद मिळविली.

दुसऱ्या दिवशी अंतिम फेरी मान्यवरांच्या उपस्थितीत



अमळनेर : प्रश्नमंजुषा स्पर्धेतील सहभागी विद्यार्थिनींना प्रमाणपत्र देताना निरंजन पेंढारे, निवृत्त प्रा. ललित मोमाया, डी. ए. धनगर आदी.

पार पडली. तीनही फेऱ्या अत्यंत उत्कंठावर्धक ठरल्या. विज्ञानातील विविध घटक, शोध, संकल्पना व सामान्यज्ञान यावर आधारित प्रश्न विचारण्यात आले. क्लासमध्ये विज्ञान विषयाबाबत विविध उपक्रम सातत्याने राबविले जातात. प्रश्नमंजुषा स्पर्धेत अनेक जण सहभागी झाले होते. विजेत्या संघांना मान्यवरांच्याहस्ते सुवर्णपदक, रौप्यपदक व कांस्यपदक प्रदान करण्यात आले. तसेच सर्व सहभागी स्पर्धकांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

# ब्रिटीशांनी १९१७ मध्ये घेतलेले ३५ हजार रुपये परत द्या !

## भारतीय कुटुंबाची मोठी मागणी; काय आहे प्रकरण?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

कधी काळी ब्रिटीश साम्राज्याचा सूर्य कधी मावळत नव्हता, अशी शेखी ब्रिटीश सरकार मिरवत होते. मात्र, भारतातील मध्य प्रदेशातील एक सर्वसाधारण शहर सेहोरमधील व्यावसायिकाच्या एका कागदावरून ब्रिटीश सरकाचा हा सूर्योदय एका स्थानिक धनिक व्यावसायिकाकडून घेतलेल्या कर्जावर झाला होता हे दिसून येते. सुमारे १०९ वर्षापूर्वी म्हणजे १९१७ मध्ये संपूर्ण जगात युद्धाचा भडका उडाला होता. त्यावेळी ब्रिटीश सरकारची अवस्था देखील फारशी चांगली नव्हती. याचदरम्यान, ब्रिटीश सरकारने भोपाळ संस्थानातील सेठ जुम्मालाल रुथिया यांच्याकडून ३५ हजार रूपयाचे कर्ज घेतले होते. त्या काळात ही रक्कम खूप मोठी होती. सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे ब्रिटीशांनी हे रुथिया यांचे कर्ज फेडलेले नाही. रुथिया कुटुंबियांनी असा दावा केला आहे, की हे कर्ज ब्रिटीश सरकारकडून फेडण्यात आलेले नाही. आता जवळपास शतकानंतर सेठ जुम्मालाल यांचे खापरपणतू विवेक रुथिया हे कर्ज वसूल करण्याच्या तयारीत आहेत. विवेक रुथिया यांनी दावा केला की त्यांच्या कुटुंबाला हा कर्जाचा कागद नुकतेच सापडला आहे. यात प्रमाणपत्र आणि काही जुने रेकॉर्ड्स देखील आहेत. विवेक रूथिया म्हणतात, ‘१९१७ मध्ये माझ्या खापर आजोबांनी ब्रिटीश सरकारला ३५ हजाराचे कर्ज दिले होते. ही रक्कम त्यांनी अजून पर्यंत फेडलेली नाही.’ विवेक रुथिया यांच्या मते ही कागदपत्रे हे कर्ज ब्रिटीश राजवटीत भोपाळ संस्थानचे प्रशासकीय व्यवस्थापन सुरळीत करण्यासाठी घेतले होते. या कर्जाला युद्ध कर्ज असे नाव देण्यात आलं होते.


# किडनीचे विकार सायलेंट किलर का ठरतात?

## धोका टाळण्यासाठी काय करावे?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

रक्त शुद्ध करणे, पाण्याचे प्रमाण नियंत्रित करणे यांसारखी शरीरातील अनेक महत्त्वपूर्ण कार्ये किडनी म्हणजेच आपल्या मूत्रपिंडावर आधारित असते. मात्र, मूत्रपिंडाच्या समस्यांची सुरुवातीची लक्षणे क्वचितच ओळखू येतात. जोपर्यंत परिस्थिती हाताबाहेर जात नाही, तोपर्यंत अनेकांना याची कल्पनाही येत नाही. अंगावर सूज येणे, धाप लागणे किंवा लघवीचे प्रमाण कमी होणे यांसारखी लक्षणे सहसा तेव्हाच दिसतात जेव्हा मूत्रपिंडाचे कार्य पूर्णपणे विस्कळित झालेले असते. त्यामुळे मूत्रपिंडाच्या आजाराकडे दुर्लक्ष करू नका, असे डॉक्टर सांगतात.

काही साध्या चाचण्यांद्वारे गंभीर समस्या उदभवण्यापूर्वीच धोका ओळखता येतो, असेही ते सांगतात. या चाचण्यांमुळे आजार रोखण्यास किंवा त्याची तीव्रता कमी करण्यास मदत होऊ शकते. अलीकडील वैज्ञानिक अभ्यास आणि सार्वजनिक आरोग्य अहवाल असे दर्शवतात, की जगभरात आणि भारतातही ही समस्या



झपाट्याने वाढत आहे. मात्र, योग्य वेळी योग्य पावले उचलल्यास हा आजार टाळणे शक्य आहे. किडनीसंबंधित विकारांना सायलेंट किलर का म्हणतात? याचा धोका कसा टाळावा आणि कोणत्या चाचण्या कराव्या? त्याविषयी डॉक्टर काय सल्ला देतात? जाणून घेऊयात.

मूत्रपिंड शरीरातील शांतपणे काम करणारा अवयव आहे. टाकाऊ पदार्थ बाहेर टाकणे, द्रव आणि क्षारांचे संतुलन राखणे, रक्तपेशी व व्हिटॅमिन डी तयार करणे आणि रक्तदाब नियंत्रित ठेवण्यास मदत करणे ही मूत्रपिंडाची मुख्य कामे आहेत. सुरुवातीच्या लक्षणांमध्ये लघवीच्या कार्यात काही प्रमाणात अडथळे येतात. मात्र, त्यामुळे तुम्हाला लगेच आजारी असल्यासारखे वाटत नाही. त्यामुळेच तज्ज्ञ ‘क्रॉनिक किडनी डिसीज’ला ‘सायलेंट किलर’ म्हणतात. लक्षणे स्पष्ट दिसेपर्यंत मूत्रपिंड ६० ते ८० टक्के निकामी झालेले असू शकते आणि परिणामी त्यावर उपचार करणे कठीण होते. जर लोकांनी नियमित तपासणी केली, तर लक्षणे दिसण्यापूर्वीच या समस्या ओळखता येतात,” असे अस्टर व्हाईटफिल्ड हॉस्पिटलमधील नेफ्रोलॉजी व किडनी ट्रान्सप्लांट विभागाच्या मुख्य सल्लागार डॉ. तोपोती मुखर्जी सांगतात. कोणत्या चाचण्यांमुळे धोका टाळता येतो ?

उच्च जोखीम असलेल्या व्यक्तींनी डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार खालील काही सोप्या नियमित चाचण्या केल्या. सीरम क्रिएटिनिन : हे मूत्रपिंडाच्या कार्यातील बदल ओळखता येतात.नियमित मूत्र चाचणी आणि युरीन .एसीआरः या चाचण्या उच्च जोखीम असलेल्या गटातील सुरुवातीचे बदल ओळखण्यास मदत करतात. किडनीची सोनोग्राफी : डॉ. मुखर्जी यांच्या मते, मधुमेह, उच्च रक्तदाब, वृद्ध व्यक्ती, मूत्रपिंडाच्या आजाराचा कौटुंबिक इतिहास असलेले लोक किंवा विशिष्ट औषधे घेणाऱ्या व्यक्तींसाठी या चाचण्या प्राथमिक स्क्रिनिंगचा भाग असाव्यात.

### कोणी आणि किती वेळा तपासणी करावी...?

डॉ. मुखर्जी म्हणतात, “ जर तुम्हाला मधुमेह, उच्च रक्तदाब, हृदयविकार, वारंवार होणारे लघवीचे संसर्ग, मूत्रपिंड निकामी झाल्याचा कौटुंबिक इतिहास असेल किंवा तुम्ही पेन किलर्स आणि डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय औषधे घेत असाल, तर या चाचण्या तुमच्या नियमित तपासणीचा भाग असायला हव्यात. अलीकडील अभ्यासातून असे दिसून आले आहे, की विविध क्षेत्रांमध्ये क्रॉनिक किडनी डिसीजचे प्रमाण खूप जास्त आहे. त्या पुढे म्हणाल्या, “जर तुम्हाला जोखीम जास्त असेल तर दरवर्षी युएसीआर आणि इजीएफआर चाचण्या करण्याबाबत तुमच्या डॉक्टरांचा सल्ला घ्या. तुम्हाला कोणताही धोका नसला तरी आजाराचे वाढते प्रमाण लक्षात घेता, नियमित तपासणी करणे फायद्याचे ठरते.”

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :– आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई–मेल : globalmahatej@gmail.com



# ‘मोमो कार्ट’ सुरू करण्यासाठी सोडली ५० लाखांची नोकरी!

## अडीच वर्षांत कमावले ‘इतके’ कोटी, ‘शार्क टँक’मधील तरुणाची प्रेरणादायी गोष्ट!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

सक्सेस स्टोरी

‘शार्क टैंक इंडिया’ या कार्यक्रमात दिसलेल्या अनेक उद्योजकांनी पुढे मोठे यश मिळविल्याची अनेक उदाहरणे समोर आली आहेत. साकेत सौरभ हे देखील अशा यशस्वी उद्योजकांपैकी एक आहेत. साकेत यांचा शार्क टँकमधील एपिसोड अद्याप प्रसारित व्हायचा बाकी आहे, तरी देखील त्यांच्याबद्दल सोशल मीडियावर मोठी चर्चा होताना दिसत आहे. साकेत यांनी सोशल मीडियावर एक रील शेअर केली आहे ज्यामध्ये त्यांनी खुलासा केला, की ते वर्षाला ५० लाख रुपयांच्या पॅकेजवर नोकरी करत होते. पण स्वतःचा फूड बिझनेस सुरू करण्यासाठी त्यांनी ही गलेलठ्ठ पगाराची नोकरी सोडली.

एका प्रसिद्धी माध्यमाशी बोलताना साकेत यांनी सांगितले, की २०१४ साली त्यांनी एनआयएफटीमधून पदवी मिळविली आणि त्यांनी स्वतःचा व्यवसाय सुरू केला, जो नंतर दुसऱ्या एका कंपनीने विकत घेतला. त्या ब्रँडने त्यांना प्रोजेक्ट मॅनेजर म्हणून कामावर घेतले, आणि ते या नोकरीमधून वर्षाला जवळपास ५२ लाख रुपये कमवत होते.

साकेत यांना पुन्हा स्वतःचा व्यवसाय सुरू करायचा होता. त्यामुळे त्यांनी गुरुग्राममध्ये




नोकरी सांभाळत एक छोटा व्यवसाय सुरू केला. त्यांनी सांगितले, की तो एक ‘जेनेरिक कॅफे’ होता, जेथे ते सर्व काही विकायचे. पण लवकरच त्यांनी कार्टच्या माध्यमातून म्हणजेच गाडीवरून मोमोजचा व्यवसाय करण्यावर लक्ष केंद्रित करण्यास सुरूवात केली. ‘त्या कार्टने चांगला व्यवसाय केला. आम्ही दररोज १० ते १२ हजार रुपयांची विक्री करत होतो,’ असे साकेत यांनी सांगितले.

‘पहिल्या वर्षी आम्ही काही कार्ट सुरू केल्या. ही एक चांगली बाजू होती, पण कार्टचा व्यवसाय हा अनिश्चिततेचा होता. आम्हाला अनेक वेगवेगळ्या अडचणी आल्या... कधी-कधी प्रशासनाकडून कार्ट हटवल्या जात, आमच्याकडे कर्मचाऱ्यांची अडचण असे आणि कधीकधी हवामानाची साथ मिळत नसे. प्रत्यक्ष काम करत असताना अशी अनेक आव्हाने होती,’अशी आठवण साकेत यांनी सांगितली.

लवकरच साकेत यांच्या लक्षात आले, की जर त्यांना ५०० कोटी रुपयांचा व्यावसाय उभा करायचा असेल, तर तो फक्त कार्टच्या माध्यमातून शक्य नाही. त्यानंतर त्यांनी स्वतःचे स्टोअर्स सुरू करण्याचा निर्णय घेतला. आज त्यांच्या या कल्पनेने मोठे रूप घेतले असून असून त्यांच्याकडे ४० मोमो कार्ट, २० छोटी आउटलेट्स आणि दोन क्विक सर्व्हिस रेस्टॉरंट्स आहेत.

**पैसा किती कमावतात?**

त्यांच्या या व्यवसायातून होणाऱ्या कमाईबद्दल माहिती देताना साकेत म्हणाले, की ‘२०२३-२४ च्या आर्थिक वर्षात जानेवारी, फेब्रुवारी आणि मार्च या फक्त तीन महिन्यांत आम्ही १६ लाख रुपये कमावले होते. गेल्या वर्षी आम्ही २.२ कोटी रुपये कमावले होते. यावर्षी आम्ही आधीच २.२ कोटी रुपयांचा टप्पा ओलांडला असून, या वर्षाच्या शेवटी आम्ही ३ कोटींपर्यंत पोहोचू. म्हणजेच गेल्या अडीच वर्षांत आम्ही ५ कोटी रुपयांहून अधिक कमाई केली आहे.’



## रस्त्यावर छोट्या लाईट्स का लावल्या जातात? त्यांना काय म्हणतात?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आपण अनेकदा प्रवास करताना पाहिले असेल, की रस्त्यावर अनेक छोट्या लाईट्स लावलेल्या असतात. याचे नाव काय आहे आणि त्या का लावल्या जातात याची सविस्तर माहिती जाणून घेऊया.

**नाव :** रस्त्याच्या मध्यभागी किंवा कडेला लावलेल्या या छोट्या चमकदार बटणांना तांत्रिक भाषेत ‘रोड स्टड्स’ असे म्हणतात.

**मुख्य उद्देश :** रात्रीच्या वेळी धुक्यात किंवा पावसाळ्यात वाहनचालकांना रस्त्याची मार्गिका आणि वळणे स्पष्टपणे दिसावीत, हा यांचा मुख्य उद्देश असतो.

**कार्य करण्याची पद्धत :** या स्टड्समध्ये विशेष रिफ्लेक्टिव्ह शीट किंवा लेन्स बसविलेले असतात. जेव्हा गाडीच्या हेडलाईटचा प्रकाश यावर पडतो, तेव्हा ते चमकू लागतात आणि चालकाला रस्ता स्पष्ट दिसतो.

**सौर उर्जेवर चालणारे स्टड्स :** काही प्रगत रोड स्टड्समध्ये सौर पॅनल आणि लहान एलईडी दिवे असतात. हे दिवसा सौर उर्जेवर चार्ज होतात आणि रात्री आपोआप प्रकाश देऊ लागतात.

**अपघात रोखण्यास मदत :** हे स्टड्स रस्त्यावरील धोके, वळणे आणि लेन बदलण्यासाठी चालकांना पूर्वसूचना देतात. ज्यामुळे रस्ते अपघातांचा धोका मोठ्या प्रमाणात कमी होतो.


## दिल्लीचा लोखंडी स्तंभ

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

गुप्त सम्राट चंदगुप्त विक्रमादित्य यांनी स्थापन केलेला महारौलीचा लोखंडी स्तंभ कुतुबमिनारजवळ हा लोखंडी स्तंभ शुद्ध लोखंडापासून बनलेला आहे. त्यात ९९.७२ टक्के लोखंड आहे, उर्वरित ०.२८ टक्के अशुद्धता आहे. हा स्तंभ महान गुप्त सम्राट चंदगुप्त विक्रमादित्य दुसरा यांनी त्यांच्या शंकांवर विजय मिळविण्याच्या निमित्ताने स्थापित केला होता. आज १६०० वर्षांनंतरही या लोखंडी स्तंभात गंज नाही. हा लोखंडी स्तंभ वैज्ञानिक संशोधन आणि प्रगतीसाठी धोकादायक आहे.

१५६ टक्के + या कोलोससचे वजन ६.८ टन आहे. खालचा व्यास ४१.०६ सें.मी. आहे, वरच्या बाजूला तो ३० सें.मी.पर्यंत वाढतो. स्तंभाची उंची ७.५ मीटर आहे. आश्चर्याची गोष्ट म्हणजे सध्या धातू विज्ञानात शुद्ध लोखंडाचे उत्पादन ही एक अतिशय गुंतागुंतीची पद्धत आणि कमी प्रमाणात आहे, परंतु आजच्या युगात लोखंडाची इतकी शुद्धता असणे अशक्य आहे.

आयआयटी कानपूरच्या प्राध्यापकांनी १९९८ मध्ये या लोखंडी स्तंभात गंज का नाही याचे कारण जाणून घेण्यासाठी हातान धरल आणि त्यावर डाक ठवले. गर्दी जमली होती. लोक फोटो काढत होते. समीर ओरडला, ‘ए फोटो काय काढताय? लाज



वाटत नाही तुम्हाला? ज्या माणसाला तुम्ही वेडा समजून दगड मारलेत ना... ते तुमचे आणि माझे बाप आहेत ज्ञानाने. हे प्राध्यापक विनायक देशपांडे आहेत. ज्यांनी हजारो इंजिनिअर्स दिल्लीचा लोखंडी लोखंडी स्तंभ एक प्रयोग केला. आयआयटीचे प्राध्यापक डॉ. बालसुब्रमण्यम यांनी स्तंभ एक प्रयोग केला. आयआयटीचे प्राध्यापक डॉ. बालसुब्रमण्यम यांनी स्तंभाचे लोखंडी पदार्थ विश्लेषण केले. या विश्लेषणात असे आढळून आले की स्तंभ लोखंड बनवताना वितळलेल्या कच्च्या लोखंडात फॉस्फरस घटक मिसळला गेला होता. यामुळे लोखंडाचे अणुबंधन होऊ शकले नाहीत, ज्यामुळे गंजाचा वेग हजारो पट कमी झाला.

आपल्या पूर्वजांना फॉस्फरसच्या गंजरोधक गुणधर्मांबद्दल कसे कळले हे आश्चर्यकारक आहे, आधुनिक काळात फॉस्फरसचे गंजरोधक गुणधर्म शोधले गेले आहेत. जगभरात फॉस्फरसचा शोध हेनिंग ब्रँडने १६६९ मध्ये लावला, असे मानले जाते. परंतु हा स्तंभ १६०० वर्षांहून अधिक जुना आहे. रस्त्यावरचा प्रत्यक वडा किवा भिकारा हा जन्मताच तसा नसता. कोणाचे नशीब कधी फिरेल सांगता येत नाही. ज्या हातांनी आज तुम्ही दगड मारताय, त्या हातांनी कधीतरी कोणाचे भविष्य घडवले असेल. शिक्षकांचा आणि बुजुर्गांचा आदर करा, परिस्थिती कशीही असो. कारण ज्ञान कधीच म्हातारे होत नसते आणि ते कधीच कचरा होत नसते.

याचा अर्थ असा की प्राचीन काळी धातुशास्त्राचे ज्ञान उच्च कोटीचे होते, फक्त दिल्लीच नाही तर धार, मांडू, माउंट अबू, कोडाचाद्री टेकड्यांवर सापडलेल्या लोखंडी खांबांमध्येही जुन्या तोफांमध्ये ही युद्ध प्रतिरोधक (अँटी-रस्ट) क्षमता आढळली आहे. दिल्लीचा हा लोखंडी स्तंभअभिमानाचे प्रतीक आहे आणि आपल्या महान इतिहासाचा थेट पुरावा आहे.



## मनशांती हवीय? आहारात ‘हे’ छोटे बदल करा, फरक अनुभवा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

मनशांती आणि आहार यावर मानसशास्त्र आणि न्युरोसायन्समध्ये सखोल संशोधन झाले आहे. या शाखेला ‘न्यूट्रिशनल सायकॉलॉजी’ असे म्हटले जाते. मानसशास्त्रीय संशोधनानुसार आपले पोट दुसरा मेंदू आहे. आपल्या शरीरातील ९५ टक्के सेरोटोनीन (हॅपी हार्मोन) हे पोटातील आतड्यांमध्ये तयार होते. तुमचे पचन संस्था बिघडलेली असेल, तर त्याचा थेट परिणाम तुमच्या मनःस्थितीवर होऊन चिंता आणि नैराश्य वाढू शकते. अतिप्रमाणात साखर किंवा रिफाईंड कार्ब्स (मैदा) चा आहारात वापर असेल, तर रक्तातील साखर वेगाने वाढते. साखरेचा हा चढ-उतार व्यक्तीला चिडचिडे आणि अस्वस्थ बनवतो. मानसशास्त्रातील ‘स्माईल ट्रायल’ संशोधनानुसार ज्यांनी ‘मेडेटेरेनियन डाएट’ (फळे, भाज्या, कडधान्ये आणि हेल्दी फॅट्स) फॉलो केला. त्यांच्यामध्ये तीव्र नैराश्याची लक्षणे ३० टक्क्यांहून अधिक कमी झाल्याचे दिसून आले. ‘चिंता आणि तणाव कमी करायचा असेल तर आहारात अक्रोड, फ्लेक्स सीड्स (अळशी) आणि मासे यांचा समावेश करा. हे मेंदूसाठी ‘सुपरफूड’ आहेत. मानसशास्त्रात केवळ ‘काय खाता’ यापेक्षा ‘कसे खाता’ यालाही महत्त्व दिले आहे. थोडे डार्क चॉकलेट खाल्ल्याने ‘एंडोर्फिन’ची पातळी वाढते. यामुळे तुमचा मूड त्वरित सुधारतो. पण लक्षात ठेवा चॉकलेट प्रमाणातच खा. पालक आणि मेथी यांसारख्या पालेभाज्यांमध्ये मॅग्नेशियम असते. हे खनिज स्नायूंना शिथिल करते आणि मनाला शांत ठेवण्यास मदत करते. पाणी कमी प्यायल्याने चिडचिड वाढू शकते. दिवसातून किमान ८-१० ग्लास पाणी प्या आणि शरीरासोबत मनही ताजेतवाने ठेवा. रात्री झोपण्यापूर्वी कॅमोमाइल टी किंवा पुदिन्याचा चहा घ्या. यामुळे चांगली झोप लागते आणि दिवसभराचा थकवा दूर होतो. दही किंवा ताक यांसारखे प्रोबायोट्रिक्स पचन सुधारतात आणि पर्यायाने मन प्रसन्न ठेवतात.

टीव्ही किंवा मोबाईल बघत जेवल्याने मेंदूला तृप्तीचा संदेश उशिरा मिळतो. ज्यामुळे अतिजेवण होते आणि नंतर मनात अपराधीपणाची भावना निर्माण होते. शांतपणे अन्नाचा स्वाद घेत जेवल्याने पॅरासिम्पेथिक नर्व्हस सिस्टीम (विश्रांती देणारी यंत्रणा) सक्रिय होते.

## कंटोली



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**


केटोली ही एक फळभाजी आहे. कारल्याच्या वर्गातील आणि सर्वांत जास्त फळभाज्या ज्या कुळातील आहेत, त्या ककुरबीटासी कुळातील या झाडाचे शास्त्रीय नाव आहे, चचविळलर वळेळलर. पावसाळा सुरू झाला की जुन्या वेलीच्या मुळाच्या गाठीपासून अथवा बिया रुजून या वेलींना फुटवा फुटतो. त्याची झपाट्याने वाढ होऊन पाच ते सहा पानांवर असतानाच जंगलात सर्वत्र या जमिनीलगत वाढलेल्या वेलींवर पिवळी फुले दिसू लागतात. बारा-पंधरा दिवसात कंटोली धरतात. आदिवासी ती शोधून बाजारात आणतात. कंटोली फळांची भाजी खूपच लोकप्रिय आहे. कंटोलीची फळे साधारणतः पाच ते सात से.मी. लांबीची असतात. आकाराने लांबट-गोल असतात व त्यावर मऊ काटे असतात. फळात बिया भरपूर असतात. कोवळ्या फळांची भाजीच चांगली होते. कंटोलीची भाजी रुचकर असते पण चिकट असते. विविध प्रकारांनी ही भाजी केली जाते, पण वालाच्या आमटीत टाकून केलेली भाजी अथवा भरलेली कंटोली छान लागतात. कारल्याच्या वर्गातील असल्याने औषधात त्याचे कडू गुणधर्म असून ते जठरोत्तेजक व सारक आहेत.

## १९९४ चे ते गुप्त मिशन : जेव्हा इराणने भारताला वाचवले

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

मार्च १९९४ मध्ये भारताचे परराष्ट्रमंत्री दिनेश सिंग आजारी होते. त्यांच्या अंगात चालण्या-बोलण्याचे त्राणही नव्हते...आणि एका रात्री दिल्लीतील एम्स हॉस्पिटलमधील त्यांच्या बेडवर दुसऱ्याच एका व्यक्तीला झोपविण्यात आले. विकलांग अवस्थेत असलेले पराराष्ट्रमंत्री व्हीलचेअरवर बसून अज्ञातस्थळी रवाना झाले. ही कोणत्याही सस्पेन्स चित्रपटाची पटकथा नाही, तर भारताची प्रतिष्ठा वाचविण्यासाठी रचलेला एक अत्यंत गोपनीय राजनैतिक डाव होता. तत्कालीन पंतप्रधान पी. व्ही. नरसिंह राव यांनी आपल्या मरणासन्न सहकाऱ्याला, दिनेश सिंह यांना एका अशा मोहिमेवर धाडले होते, ज्यावर भारताचे भवितव्य अवलंबून होते.

आज जेव्हा आपण जागतिक राजकारणात भारताच्या वाढत्या प्रभावाच्या चर्चा करतो पण ३२ वर्षांपूर्वीचा तो काळ विसरून चालणार नाही. त्यावेळी सोव्हिएत युनियन कोसळले होते आणि रशिया स्वतःच्याच



अस्तित्वासाठी संघर्ष करत होता. भारताची आर्थिक स्थिती खालावलेली होती आणि आपण आपले सोने गहाण ठेवून अर्थव्यवस्था सावरण्याचा प्रयत्न करत होतो. अशा परिस्थितीत पाकिस्तानने ‘ऑर्गनायझेशन ऑफ इस्लामिक कोऑपरेशन’ आणि काही पाश्चात्य देशांच्या मदतीने काश्मीर प्रश्नावरून भारताला जागतिक स्तरावर घेरण्याची तयारी पूर्ण केली होती.

जिनेव्हामध्ये संयुक्त राष्ट्र मानवाधिकार आयोगाच्या बैठकीत काश्मीरमधील कथित मानवाधिकार उल्लंघनावरून भारतावर निर्बंध लादण्याचा ठराव येणार होता. हा ठराव मंजूर झाला असता, तर भारतावर आर्थिक निर्बंध लादले गेले असते आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर आपली मोठी नाचक्की झाली असती. ओआयसीमध्ये कोणताही निर्णय ‘सर्वसंमती’शिवाय घेतला जात नाही, हे ओळखून नरसिंह राव यांनी इराणकडे मदतीचा हात मागण्याचा निर्णय घेतला.

तेहरान विमानतळावर जेव्हा भारताचे विशेष विमान उतरले, तेव्हा तेथील एल्ब्रूझ पर्वतरांगा बर्फाने झाकलेल्या होत्या. कडाक्याच्या थंडीत परराष्ट्रमंत्री दिनेश सिंह यांना व्हीलचेअरवरून खाली उतरविण्यात आले. त्यांच्यासोबत तीन मदतनीस आणि एक डॉक्टर होते. इराणचे परराष्ट्रमंत्री डॉ. अली अकबर वेलायती स्वतः प्रोटोकॉल तोडून विमानतळावर आले होते. दिनेश सिंह यांची प्रकृती पाहून तेही थक्क झाले. त्यांनी सिंह यांचा हात हातात घेऊन विचारले, की ‘अशा अवस्थेत इतका जीवघेणा प्रवास करण्याइतकी काय आणीबाणी आली होती?’

दिनेश सिंह यांनी फक्त एक स्मितहास्य केले आणि भारताची ‘डेमार्श’ (राजनैतिक विनंती) त्यांच्या हाती सोपविली. काही तासांतच इराणचे राष्ट्राध्यक्ष अली अकबर हाशमी रफसंजानी यांच्याशी त्यांची भेट झाली. इराणने भारताला शब्द दिला की ते भारताच्या प्रतिष्ठेला धक्का लागू देणार नाहीत. त्यानंतर ७२ तासांत जे घडले, त्याने पाकिस्तान आणि पाश्चात्य देशांचे मनसुबे धुळीला मिळाले. इराणने ओआयसीच्या ठरावात खोडा घातला आणि सर्वसंमती नसल्यामुळे तो ठरावच बाद झाला. भारताला जागतिक अपमानातून वाचवणारा तो देश इराण होता.

दिनेश सिंह यांनी आपल्या आयुष्यातील शेवटची राजनैतिक मोहीम फत्ते केली आणि ते दिल्लीला परतले. परतल्यावर ते थेट हॉस्पिटलमध्ये दाखल झाले आणि त्यानंतर काहीच महिन्यात त्यांचे निधन झाले. मात्र, गेल्या काही वर्षांतील घडामोडी पाहिल्या तर इराण आणि भारताचे संबंध खालावत आहेत. २००५ मध्ये जेव्हा इराणच्या अणुकार्यक्रमावरून आंतरराष्ट्रीय अणुऊर्जा एजन्सीमध्ये मतदान झाले, तेव्हा भारताने अमेरिकेच्या दबावाखाली इराणच्या विरोधात मतदान केले. भारताच्या या भूमिकेमुळे इराण कमालीचा दुखावला गेला होता. ज्या इराणने १९९४ मध्ये भारतासाठी पाकिस्तानसोबत पंगा घेतला, त्याच इराणला भारताने गरजेच्या वेळी एकटे पाडले आहे का? भारताने अमेरिकेच्या निर्बंधांच्या भीतीने इराणकडून तेल खरेदी करणे आधीच बंद केले आहे. इराणमधील सूत्रांच्या मते तेहरान आता भारताऐवजी चीनकडे अधिक आशेने पाहत आहे. भारताने वेळोवेळी पाश्चात्य देशांच्या सुरात सूर मिसळल्यामुळे इराणचा भारतावरील विश्वास कमी होत चालला आहे.

राजकारणाच्या बुद्धिबळावर आपण आज भलेही वजीर झालो असू, पण ज्या प्याद्याने आपल्याला वाचवले, त्याला आपण आज बोर्डावरून बाहेर काढले आहे का?

शांत - चांगल्या झोपेसाठी चांगला पलंग नव्हे तर चांगली गादी आवश्यक आहे.
सर्वोत्तम क्वालिटीच्या गादी साठी



एकमेव ४५ वर्षांचा समृद्ध अनुभव असलेले शोरुम

सीमा हॅण्डलूम हॉउस पारोला रोड, धुळे



# ॥ मंगल ॥ पान

## आपले दुष्कर्म आपणच भोगणे...

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

कर्मचक्र फेरा हे वारंवार ऐकले, बोलले अथवा वाचले जाते, पण ते म्हणजे नेमके काय हे पाहू. जगातील सर्व योनीत देह धारण करणारा प्रत्येक जीव हा या कर्मचक्रानुसार जन्म घेतो. त्यानुसार जीवन व्यतीत करून त्यानुसारच जीवन संपवतो. यातून कोणाचीही सुटका नाही. मागील संचित व कर्मानुसार झालेला जन्म या जन्मातील कर्मानुसार जीवन संपवतो व पुढील जन्म प्राप्त त्यास मिळतो.

जे योग्य आध्यात्मिक मार्गात राहून जीवन घालवतात ते या किंवा पुढील कोणत्या तरी जन्मात जीवनमुक्त होतात व या चक्रातून सुटतात. पितामह भीष्म शरपंजरी पडले होते त्यांनी आयुष्यभर भगवंताची भक्ती केली व श्रीकृष्ण हे भगवंत आहेत हे देखील जाणले होते. पण असे मरण येत आहे याचे शल्य त्यांना सलत होते. शेवटी भगवंताची शरपंजरी अवस्थेत त्यांची भेट झाली असता त्यांनी विचारले, की हे देवकीनंदन मला असे मरण का येत आहे, हे मला समजत नाही. माझ्या भक्तीच्या आधारे मी मागील तीन जन्म जाणू शकतो. त्यातही काही पाप घडलेले नाही मग असे का व्हावे. भगवंताने त्यांच्या भृमध्यावर बोट ठेवून डोळे मिटण्यास सांगितले असता त्यांना मागील एकेक जन्म दिसू लागला. ९९ जन्मापर्यंत कोणतेही पाप घडले नव्हते. १०० वर्मा जन्मात ते एक राजा होते. त्यांना दरबारात सेवकाने येऊन सांगितले, की महाराज नगरात राजरस्त्यावर एक मोठा अजस्त्र सर्प पसरलेला असून नागरिकांना तेथून जा-ये करता येत नाही. त्यावर त्या राजाने तो सर्प तेथून हलवून जंगलात सोडून द्या, अशी आज्ञा दिली. सेवकांनी तसे केले. परंतु तसे करताना तो सर्प एका काटेरी झुडपात पडून त्याच्या सर्वांगात काटे शिरून असह्य वेदनेने तडफडून काही दिवसांत मरण पावला.

हे पाहिल्यावर भीष्मांनी विचारले, की देवा हे मी केले नाही व तसे करण्यात माझा काही स्वार्थ नव्हता व ते लोकांच्या भल्यासाठीच केले होते. भगवंत म्हणाले, की पितामह ते तुमच्या आज्ञेने झाले. म्हणजे कारणीभूत तुम्हीच ठरलात. तुमचा उद्देश चांगला असो वा नसो. पण एका जीवास मरणप्राय वेदना होऊन त्याला मरण आले. मी जेव्हा कोणालाही मुक्ती देतो तेव्हा त्याच्या मागील सर्व कर्मांचे भोग भोगायला लावूनच पूर्ण शुद्ध व पवित्र करूनच माझ्यात सामावून घेतो. हे आहे कर्मचक्र साधक भक्त यांना जो जास्त त्रास होतो त्याचे कारण हेच आहे. मागील सर्व पापांची कर्मांची भोगाद्वारे निवृत्ती करून घेतली जाते आणि भोग भोगल्याखेरीज अद्वैत प्राप्ती होत नाही.

**भोग भोगीताची आटला भेद (श्री संत तुकाराम महाराज)**

तरी हे माझ्याच बाबतीत का घडते? हा विकल्प कधीच मनात आणू नका. भगवंतास जाणणाऱ्या भीष्मांना देखील १०० वर्मा जन्मात कर्मचक्राचा भोग भोगायला लावून नंतरच मुक्त केले. आपल्याला तर मागचा जन्मही आठवत नाही. सद्गुरू उपासना व सतत नामस्मरण यामुळे आपण मुक्त होऊ शकतो. कारण अंतकाळी ते शिष्याजवळ उपस्थित असतात व यमदूतापासून वाचवतात. पण तेवढा दृढविश्वास व पराकोटीचा भाव असला तरच.

## पार्वती ही है माता दुर्गा

**भाग-१**

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

हिन्दू धर्म में सैंकड़ों देवियां हैं। उनमें से कुछ प्रजापतियों की पुत्रियां हैं, तो कुछ स्यंभू हैं और कुछ अन्य किसी देवता की पत्नियां हैं। यहां हम जानेगे माता दुर्गा का रहस्य जिन्हें अम्बे, जगदम्बे, शेरावाली, पहाड़ावाली, चामुंडा, तुलजा आदि कहा जाता है। जिन्हें महिष मर्दिनी और शुम्भ-निशुम्भ, चंड-मुंड और रक्तबीज आदि का वध करने वाली कहा जाता है।

लेकिन क्या ये सभी देवियां एक ही है या अलग-अलग? क्या ब्रह्मा की पत्नीं सरस्वती उनकी पुत्रीं थीं और क्या लक्ष्मी दो थीं? यह तो आप जानते ही होंगे कि सरस्वती और लक्ष्मी इन दुर्गा माता से भिन्न हैं, लेकिन अब सवाल यह उठता है कि पार्वती भी क्या दुर्गा या अम्बे ही है? क्या काली, तारा, छिन्नमस्ता, षोडशी, भुवनेश्वरी, त्रिपुरभैरवी, धूमावती, बगलामुखी, मातंगी और कमला ये सभी एक ही माता हैं? क्या शैलपुत्री, ब्रह्मचारिणी, चंद्रघंटा, कूष्मांडा, स्कंदमाता, कात्यायनी, कालरात्रि, महागौरी और सिद्धिदात्री माता सभी एक ही है? जानिए इसका रहस्य आदि शक्ति मां जगदम्बे शिवपुराण के अनुसार उस अविनाशी परब्रह्म (काल) ने कुछ काल के बाद द्वितीय की इच्छा प्रकट की। उसके भीतर एक से अनेक होने का संकल्प उदित हुआ। तब उस निराकार परमात्मा ने अपनी लीला शक्ति से आकार की कल्पना की, जो मूर्तिरहित परम ब्रह्म है। परम ब्रह्म अर्थात एकाक्षर ब्रह्म।

परम अक्षर ब्रह्म। वह परम ब्रह्म भगवान सदाशिव है। एकांकी रहकर स्वेच्छा से सभी ओर विहार करने वाले उस सदाशिव ने अपने विग्रह (शरीर) से शक्ति की सृष्टि की, जो उनके अपने श्रीअंग से कभी अलग होने वाली नहीं थी। सदाशिव की उस पराशक्ति को प्रधान प्रकृति, गुणवती माया, बुद्धि तत्व की जननी तथा विकाररहित बताया गया है। वह शक्ति अम्बिका (पार्वती या सती नहीं) कही गई है। उसको प्रकृति, सर्वेश्वरी, त्रिदेव जननी (ब्रह्मा, विष्णु और महेश की माता), नित्या और मूल कारण भी कहते हैं। सदाशिव द्वारा प्रकट की गई उस शक्ति की ८ भुजाएं हैं। पराशक्ति जगतजननी वह देवी नाना प्रकार की गतियों से संपन्न है और अनेक प्रकार के अस्त्र शक्ति धारण करती है। एकांकिनी होने पर भी वह माया शक्ति संयोगवशात अनेक हो जाती है। उस कालरूप सदाशिव की अर्द्धांगिनी को ही अम्बा जगदम्बा कहते हैं।

### नवरात्रि की नौ देवियां

नवरात्रि के नौ दिनों में जिन देवियों को पूजा जाता है उनमें से कौन सी देवी का संबंध किससे है यह जानना जरूरी है। पहली देवी शैलपुत्री को सती कहा गया है जो दक्ष की पुत्र थीं, जिन्होंने यज्ञ की आग में कूदकर खुद को भस्म कर लिया था। इसके बाद उन्होंने ही ब्रह्मचारिणी के रूप में दूसरा जन्म लिया और वे ही बाद में स्कंद (कार्तिकेय) की माता कहलाई। कठोरतप करने के कारण जब उनका वर्ण काला पड़ गया तब शिव ने प्रसंन्न होकर इनके शरीर को गंगाजी के पवित्र जल से मलकर धोया तब वह विद्युत प्रभा के समान अत्यंत कांतिमान-गौर हो उठा। तभी से इनका नाम महागौरी पड़ा। यही माता हिमालय की पुत्री होने के कारण पार्वती कहलायी।

### ये हैं नवदुर्गा

शैलपुत्री, ब्रह्मचारिणी, चंद्रघंटा, कूष्मांडा, स्कंदमाता, कात्यायनी, कालरात्रि, महागौरी और सिद्धिदात्री माता सभी एक ही है? इससे यह सिद्ध हुआ की शैलपुत्री,

स्कंदमाता और महागौरी तो शिवजी की पत्नियां हैं और बाकी सभी आदि शक्ति जगदम्बा के ही रूप हैं जो शिवजी की माता हैं। कात्यायनी का नाम इसलिए कात्यायनी पड़ा क्योंकि कात्य गोत्र में जन्में प्रसिद्ध महर्षि कात्यायन ने भगवती पराम्बा की कठिन तपस्या की थीं। उनकी इच्छा थी कि उन्हें पुत्री प्राप्त हो। तब मां भगवती ने उनके घर पुत्री के रूप में जन्म लिया। इसलिए यह देवी कात्यायनी कहलाईं। कात्यायनी देवी रावण के राज्य के महल की रक्षा करती थीं।

### दस महाविद्याओं के नाम और रहस्य

काली, तारा, छिन्नमस्ता, षोडशी, भुवनेश्वरी, त्रिपुरभैरवी, धूमावती, बगलामुखी, मातंगी और कमला। कहीं कहीं इनके नाम इस क्रम में मिलते हैं:-१.काली, २.तारा, ३.त्रिपुरसुंदरी, ४.भुवनेश्वरी, ५.छिन्नमस्ता, ६.त्रिपुरभैरवी, ७.धूमावती, ८.बगलामुखी, ९.मातंगी और १०.कमला। अब सवाल यह उठता है कि ये सभी माता सती या पार्वती के ही रूप हैं या की माता अम्बिका के रूप हैं या कि से सभी अलग-अलग देवियां हैं।

**१.काली : –** इसमें से काली माता को भगवान शंकर की पत्नीं



कहा गया है। इन्होंने ही असुर रक्तबीज का वध किया था।

**२.तारा : –** दूसरी माता है तारा जो प्रजापति दक्ष की दूसरी कन्या थी। यह तारा माता

**३.शैलपुत्री** (सती) की बहिन हैं। तारा देवी को हिन्दू, बौद्ध और जैन तीनों की पूजते हैं। यह तांत्रिकों की प्रमुख देवी तारा।

**४.त्रिपुरसुंदरी : –** इनकी चार भुजा और तीन नेत्र हैं। इसे ललिता, राज राजेश्वरी और त्रिपुर सुंदरी भी कहा जाता है। भारतीय राज्य त्रिपुरा में स्थित त्रिपुर सुंदरी का शक्तिपीठ है। यहां वस्त्र और आभूषण गिरे थे। त्रिमूर्ति (ब्रह्मा, विष्णु, महेश्वर शिव) की जननी होने सेसे जगदम्बा ही त्रिपुरा हैं। उल्लेखनीय है कि महाविद्या समुदाय में त्रिपुरा नाम की अनेक देवियां हैं, जिनमें त्रिपुरा-भैरवी, त्रिपुरा और त्रिपुर सुंदरी विशेष रूप से उल्लेखनीय हैं।

**५.भुवनेश्वरी : –** चौदह भुवनों की स्वामिनी मां भुवनेश्वरी शक्ति सृष्टि क्रम में महालक्ष्मी स्वरूपा हैं। महाविद्याओं में इन्हें चौथा स्थान प्राप्त हैं। सम्पूर्ण जगत के पालन पोषण का दाईत्व इन्हीं भुवनेश्वरी देवी का हैं, परिणाम स्वरूप ये जगन माता तथा जगत धात्री के नाम से भी विख्यात हैं। प्रकृति से सम्बंधित होने के परिणाम स्वरूप, देवी की तुलना मूल प्रकृति से भी की जाती हैं।
काली और भुवनेशी प्रकारांतर से अभेद है काली का लाल वर्ण स्वरूप ही भुवनेश्वरी हैं। दुर्गम नमक दैत्य के अत्याचारों से लोगों को निजाद दिलाने वाली के कारर ये शाकम्भरी और दुर्गा नाम से भी प्रसिद्ध हुई। देवी के मस्तक पर चंद्रमा शोभायमान है।
तीनों लोकों का तारण करने वाली तथा वर देने की मुद्रा अंकुश पाश और अभय मुद्रा धारण करने वाली मां भुवनेश्वरी अपने तेज एवं तीन नेत्रों से युक्त हैं।

### छिन्नमस्ता

यह देवी माता पार्वती का ही एक रूप है। देवी का मस्तक कटा हुए है इसीलिए उनको छिन्नमस्ता कहा गया है। उनके साथ उनकी सहचरणीं जया व विजया हैं। तीनों मिलकर उनके धड़ से निकली रक्त की तीन धाराओं का स्तवन करते हुए दर्शायी गई है। कामाख्या के बाद दुनिया के दूसरे सबसे बड़े शक्तिपीठ के रूप में विख्यात मां छिन्नमस्तिके मंदिर काफी लोकप्रिय है।झारखंड की राजधानी रांची से लगभग ७९ किलोमीटर की दूरी रजरप्पा के भैरवी-भेड़ा और दामोदर नदी के संगम पर स्थित मां छिन्नमस्तिके का यह मंदिर है। रजरप्पा की छिन्नमस्ता को ५२ शक्तिपीठों में शुमार किया जाता है।

### त्रिपुरभैरवी

नारद-पाञ्चरात्र के अनुसार यह माता काली का ही स्वरूप है। यह महाविद्या के रूप में छठी शक्ति है। त्रिपुर का अर्थ तीनों लोक। दुर्गा सप्तशती के अनुसार देवी त्रिपुर भैरवी, महिषासुर नामक दैत्य के वध के काल से सम्बंधित हैं। त्रिपुरा भैरवी ऊर्ध्वान्वय की देवता हैं।

माता की चार भुजाएं और तीन नेत्र हैं। इन्हें षोडशी भी कहा जाता है। षोडशी को श्रीविद्या भी माना जाता है।
देवी अपने अन्य नमो से प्रसिद्ध है तथा ये सभी सिद्ध योगिनिया हैं:-१.त्रिपुर भैरवी २.कौलेश भैरवी, ३.रूद्र भैरवी, ४.चैतन्य भैरवी, ५.नित्य भैरवी, ६.भद्र भैरवी, ७.श्मशान भैरवी, ८.सकल सिद्धि भैरवी ९.संपत प्रदा भैरवी १०. कामेश्वरी भैरवी इत्यादि।
इसकी साधना से षोडश कला निपुण सन्तान की प्राप्ति होती है।
देवी त्रिपुर भैरवी का घनिष्ठ संबंध 'काल भैरव' से है, जो जीवित तथा मृत मानवों को अपने दुष्कर्मो के अनुसार दंड देते हैं तथा अत्यंत भयानक स्वरूप वाले तथा उग्र स्वाभाव वाले हैं। काल भैरव, स्वयं भगवान शिव के ऐसे अवतार है, जिन का घनिष्ठ संबंध विनाश से है।

### धूमावती

सातवीं महाविद्या धूमावती को पार्वती का ही स्वरूप माना गया है। एक बार देवी पार्वती भगवान शिव के साथ कैलाश पर विराजमान थीं। उन्हें अकस्मात् बहुत भूख लगी और उन्होंने वृषभ-ध्वज पशुपति से कुछ खाने की इच्छा प्रकट की। शिव के द्वारा खाद्य पदार्थ प्रस्तुत करने में विलम्ब होने के कारण क्षुधा पीड़िता पार्वती ने क्रोध से भर कर भगवान शिव को ही निगल लिया। ऐसा करने के फलस्वरूप पार्वती के शरीर से धूम-राशि निस्सृत होने लगी जिस पर भगवान शिव ने अपनी माया द्वारा देवी पार्वती से कहा, धूम्र से व्याप्त शरीर के कारण तुम्हारा एक नाम धूमावती पड़ेगा।

एक अन्य कथा के अनुसार महाप्रलय के समय जब सब कुछ नष्ट हो जाता है, स्वयं महाकाल शिव भी अंतर्ध्यान हो जाते हैं, मां धूमावती अकेली खड़ी रहती हैं और काल तथा अंतरिक्ष से परे काल की शक्ति को जताती हैं। उस समय न तो धरती, न ही सूरज, चांद , सितारे रहते हैं। रहता है सिर्फ धुआं और राख- वही चरम ज्ञान है, निराकार- न अच्छा. न बुरा; न शुद्ध, न अशुद्ध; न शुभ, न अशुभ- धुएँ के रूप में अकेली माँ धूमावती. वे अकेली रह जाती हैं, सभी उनका साथ छोड़ जाते हैं. इसलिए अल्प जानकारी रखने वाले लोग उन्हें अशुभ घोषित करते हैं.

### बगलामुखी

बगलामुखी, दो शब्दों के मेल से बना है, पहला 'बगला' तथा दूसरा 'मुखी'। बगला से अभिप्राय हैं 'विरूपण का कारण' और वक या वगुला पक्षी, जिस की क्षमता एक जगह पर अचल खड़े हो शिकार करना है, मुखी से तात्पर्य हैं मुख। देवी का घनिष्ठ सम्बन्ध अलौकिक, पारलौकिक जादुई शक्तिओ से भी हैं, जिसे इंद्रजाल काहा जाता हैं। देवी बगलामुखी, समुद्र के मध्य में स्थित मणिमय द्वीप में अमूल्य रत्नो से सुसज्जित सिंहासन पर विराजमान हैं। देवी त्रिनेत्रा हैं, मस्तक पर अर्ध चन्द्र धारण करती है, पीले शारीरिक वर्ण की है, देवी ने पिला वस्त्र तथा पीले फूलो की माला धारण की हुई है, देवी के अन्य आभूषण भी पीले रंग के ही हैं तथा अमूल्य रत्नो से जड़ित हैं। स्वतंत्र तंत्र के अनुसार, सत्य युग में इस चराचर संपूर्ण जगत को नष्ट करने वाला भयानक वातक्षोम (तूफान, घोर अंधी) आया।

समस्त प्राणिओ तथा स्थूल वस्तुओं के अस्तित्व पर संकट गहरा रहा था तथा सब काल का ग्रास बनने जा रहे थे। संपूर्ण जगत पर संकट को ए हुआ देख, जगत के पालन कर्ता भगवान विष्णु अत्यंत चिंतित हो गए। तदनंतर, भगवान विष्णु सौराष्ट्र प्रान्त में गए तथा हरिद्रा सरोवर के समीप जाकर, अपनी सहायतार्थ देवी श्री विद्या महा त्रिपुर सुंदरी को प्रसन्न करने हेतु तप करने लगे। उस समय देवी श्री विद्या, सौराष्ट्र के एक हरिद्रा सरोवर में वास करती थी। भगवान विष्णु के तप से संतुष्ट हो देवी आद्या शक्ति, बगलामुखी स्वरूप में, भगवान विष्णु के सन्मुख अवतरित हुई तथा उनसे तप करने का कारण ज्ञात किया। तुरंत ही अपनी शक्तिओ का प्रयोग कर, देवी बगलामुखी ने विनाशकारी तूफान को शांत किया तथा इस सम्पूर्ण चराचर जगत की रक्षा की। भारत में मां बगलामुखी के तीन ही प्रमुख ऐतिहासिक मंदिर माने गए हैं जो क्रमशः दतिया (मध्यप्रदेश), कांगड़ा (हिमाचल) तथा नलखेड़ा जिला शाजापुर (मध्यप्रदेश) में हैं। तीनों का अपना अलग-अलग महत्व है।

**क्रमशः**



## तुका झालासे कळस...

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

संत तुकाराम बीज अर्थात जगद्गुरू संत तुकाराम महाराजांची पुण्यतिथी. भागवत धर्म मंदिराचा कळस बनलेल्या संत तुकाराम महाराजांच्या अभंगवाणीचा स्पर्श ज्याला झाला नाही असा कोणी मराठी मनुष्य सापडणार नाही. संतश्रेष्ठ तुकारामांचे पावन चरित्र म्हणजे वैराग्याचा मंगल कलश आहे. नराचा नारायण कसा होऊ शकतो याचा प्रत्यय तुकारामांच्या चरित्रात आहे.

संत तुकारामांचा जन्म इ. स. १६०८ मध्ये पुण्याजवळील देहू या गावात झाला. त्यांचे संपूर्ण नाव तुकाराम बोल्होबा आंबिले / मोरे त्यांचे घराणे प्रतिष्ठित गणले जात होते. देहूच्या महाजनकीचा हक्क आणि उत्पन्न परंपरेने त्यांच्याकडे चालू होते. शेती, साबकारी आणि व्यापार हा व्यवसायही पारंपरिक होता. विठ्ठल भक्तीचे दृढ संस्कार या घराण्यातच रुजलेले होते. याविषयी महाराज म्हणतात-
विश्वंभर बाबा पांडुरंगाचे एकनिष्ठ भक्त होते. त्यांनी आपल्या गावातच विठ्ठल-रुक्मिणीची मूर्ती स्थापन केली होती. विठ्ठलाची उपासना त्यामुळे वर्षानुवर्षे तुकारामांच्या घराण्यात होत राहिली व तिचा वारसा तुकारामांपर्यंत चालत आला.

**माझ्या वडिलांची मिरासी गा देवा । तुझी चरण सेवा पांडुरंगा ।।**

तुकारामांचे वडील बोल्होबा व आई कनकाई यांनी विठ्ठलाच्या उपासनेचे व्रत घरात अखंड चालू ठेवले होते. ते संस्कार तुकाराम आणि त्यांचे बंधू सावजी व कान्होबा यांच्या मनात पूर्णपणे उतरले. बालपणापासूनच त्यांच्या कानावर आणि मनावर विठ्ठलाचे नाव पुन्हा पुन्हा येत होते आणि ते त्यांच्या चित्तात रुजत होते. विठ्ठल हे आपल्या जीवनाचे निधान आहे आणि कुलदैवतही आहे. हे सांगताना संत तुकाराम महाराज म्हणतात-
**विठ्ठल आमचे जीवन। आगमनिगमाचे स्थान । विठ्ठले सिद्धीचे साधन । विठ्ठल ध्यान विसावा ।। विठ्ठल कुळीचे दैवत । विठ्ठल वित्त गोत्र चित्त ।। विठ्ठले पुण्य आणि पुरुषार्थ । आवडे आत विठ्ठलाची ।।**

विठ्ठलाला आपले सर्वस्व मानणाऱ्या तुकोबांनी त्याच्या प्राप्तीसाठी रात्रंदिन आपल्या अभंगातून अक्षरशः टाहो फोडला. तुकारामांचे व त्यांच्या दोन बंधूंचे विवाह तत्कालीन पद्धतीला अनुसरून बालवयातच झाले. तुकारामांची पहिली बायको रुक्मिणी हीस दम्याच्या विकाराने ग्रासल्यामुळे खेड गावाच्या गुळवे सावकारांच्या मुलीशी तुकोबांचे दुसरे लग्न करून देण्यात आले. वडील भाऊ सावजीच्या उदासीन वृत्ती आणि प्रपंचापेक्षा परमार्थाच्या ओढ्यामुळे तुकोबांनी संसाराची सारी सूत्रे मोठ्या निर्धाराणे आपल्या हातात घेतली. त्यावेळी त्यांचे वय केवळ तेरा वर्षांचे होते. बालवयातच व्यापार-उदीम सांभाळून घराण्याच्या प्रतिष्ठेला सुसंगत अशा रीतीने न्यायाने आणि उत्तम व्यवहाराने धन मिळवावे आणि उदासीन वृत्तीने ते खर्च करावे हा बहुमोलाचा धडा त्यांनी गिरवला. पण नियतीची एक विध्वंसक लाट आली आणि त्यांच्या आयुष्याची घडी पूर्ण विस्कटून गेली. माता-पित्यांचा मृत्यू झाला तेव्हा तुकारामांचे वय १७ वर्षांचे होते. वडील भाऊ सावजी यांची पत्नीही मरण पावली. सावजी तीर्थयात्रा करण्यासाठी दूर निघून गेले ते पुन्हा न परतण्यासाठी. त्यानंतर थोड्याच दिवसांत म्हणजेच सन १६२८-२९ मध्ये महाराष्ट्रात भयानक दुष्काळ पडला. व्यापार बुडाला, कर्ज झाले, आर्थिक स्थिती ढासळली. या स्थितीचे वर्णन करताना महाराज म्हणतात-
**काय खावे । आता कोणीकडे जावे। गावात राहावे कोण्या बळे ।।**

दुष्काळात गुरेढोरे मेली, पहिली पत्नी अन्न-अन्न करीत तडफडून मरण पावली. तिच्यामागे त्यांचा मुलगाही गेला. घरात जणू मृत्यूने थैमान घातलेले त्यांनी पाहिले संसार हा किती विलक्षण दुःखांनी भरलेला आहे. नियतीसारख्या बलाढ्य शक्तींसमोर माणूस किती दुबळा आहे याची दाहक प्रतिती तुकोबा 'याचि देही याचि डोळा' पाहत होते. त्यामुळे ते संसारातील सर्वच सुखाकडे विरक्तीने पाहू लागले, वास्तवाची मीमांसा करू लागले, आत्मचिंतन करू लागले. त्यातून त्यांच्या मनात वैराग्याची निर्मिती झाली. या स्थितीचे वर्णन करताना ते म्हणतात- **बरे झाले देवा निघाले दिवाळे। बरी या दुष्काळे पीडा केली ।। अनुतापे तुझे राहिले चितन। जाला हा वमन संसार ।। बरे झाले देवा बाईल कर्कशा। बरी हे दुर्दशा जनामधे ।। बरे झाले जागी पावलो अपमान । बरे गेले वन ढोरे गुरे ।। बरे झाले नाही घरिली लोकलाज। बरा आलो तुज शरण देवा ।। बरे झाले तुझे केले देवाईल । लेकरे बाईल उपेक्षिली ।। तुका म्हणे बरे व्रत एकादशी। केले उपवासी जागरण ।।**

दुःखातून वैराग्याच्या वाटेने तुकोबा गेले. पण विवेकाने त्यांचा तोल सतत राखला. विवेकनिष्ठ भक्ताच्या वाट्याला जेव्हा दुःख आणि दारिद्र्य येते तेव्हा ते त्याला वरदानासारखेच वाटते. आता तुकोबांना मानवी जीवितांच्या वास्तविक अर्थाचा शोध करण्याचा ध्यास लागला, आणि त्यांनी भामनाथाच्या डोंगराचा आश्रय घेतला. या डोंगरातील एकांतात बसून ते आत्मचिंतन करू लागले. परमेश्वरभक्ती हाच सर्व सुख-दुःखातून मुक्त होण्याचा एकमेव उपाय आहे. या निष्कर्षाप्रत ते पोहोचले. ईश्वरच आपला रक्षणकर्ता आहे सांगताना ते म्हणतात-
**नको नको मना गुंतू मायाजाळी । काळ आला जवळी ग्रासावया ।। काळाची हे उडी पडेल बा जेव्हा । सोडविना तेव्हा मायबापा ।। सोडविना राजा देशिला चौधरी। आणीक सोयरे भले भले ।। तुका म्हणे तुज सोडविना कोणी । एका चक्रपाणी वाचूनिया ।।**

आणि त्या चक्रपाणीचा अर्थात विठ्ठलाचा संत तुकारामांना साक्षात्कार झाला. आईपासून मुकलेल्या बालकाला पुन्हा आई भेटावी आणि त्याने तिला विलक्षण आवेगाने मिठी मारावी तशी तुकोबांची अवस्था झाली. या आनंदाचे वर्णन करताना तुकोबा म्हणतात- **आनंदाचे डोही आनंद तरंग । आनंदचि अंग आनंदाचे ।। काय सांगो झाले काहीचियाबाही। पुढे चाली नाही आवडीने ।। गर्भाचे आवडी मातेचा डोहाळा । तेथीचा जिव्हाळा तेथे बिंबे ।। तुका म्हणे तैसा ओतलासे ठसा । अनुभव सरिसा मुखा आला ।।**

पांडुरंगाचा साक्षात्कार झाल्यामुळे आता आपल्या साऱ्या कामना पूर्ण झाल्या, आता आपण उपकारापुरते उरलो आहोत असे ते म्हणतात. जगाला उद्देशून ते म्हणतात-
**जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती । देह कष्टविती उपकारे ।। भूतांची दया हे भांडवल संतां । आपुली ममता नाही देही ।। तुका म्हणे सुख पराविया सुख । अमृत हे मुखे स्रवतसे ।।**

प्राणिमात्राविषयी करुणा हाच संतांचा स्थायीभाव असतो. खऱ्या सुखाची वाट दाखविण्यासाठी ते सदैव तत्पर असतात. तुकोबांना ईश्वरासंबंधीची एक चिवट निष्ठा असेल असा देवभक्त, पापभिरू, सहिष्णु, शूर समाज निर्माण करावयाचा होता. वाईट चालीरीती, परंपरांच्या आडराने भरलेल्या या समाजाला योग्य वाटेवर आणायचे होते म्हणून ते म्हणतात-
**आम्ही वैकुंठवासी । आलो याचि कारणासी ।। बोलिले जे ऋषी। साच भावे वर्ताया ।। झाडू संतांचे मारग। आडरांनी भरले जग । उच्छिष्टाचा भाग। शेष उरला तो सेवू ।। अर्थे लोपली पुराणे। नाश केला शब्दज्ञाने । विषयलोभी मने । साधने बुडविली ।। पिटू भक्तीचा डांगोरा । कळिकाळासी दरारा ।। तुका म्हणे करा। जयजयकार आनंदे ।।**

तत्कालीन तथाकथित धर्मज्ञ, नीतिमार्तंड केवळ शब्दज्ञानाच्या आहारी गेले होते. माणुसकी, दया, समता, क्षमाभाव, दृष्टीतील उदारता हे गुण लुप्त झाले होते. लक्षावधी भोळ्याभाबड्या स्त्री-पुरुषांच्या मनात देव, धर्म व सांस्कृतिक मूल्ये यांच्यासंबंधीची डोळस आत्मीयता त्यांनी कधीच निर्माण केली नव्हती. ते केवळ शब्दज्ञानात आकंठ बुडाले होते. केवळ नाममात्र शब्द उरले होते, त्यातील खरा अर्थ लुप्त झाला होता, अशा वेळी विखुरलेला आणि पथभ्रष्ट झालेला समाज संघटित करून योग्य मार्गावर नेण्याचे कार्य संत तुकारामांनी आपल्या अनेक अभंगातून केले. 'जे जे भेटे भूत ते ते मानिजे भगवंत' ही शिकवण असणाऱ्या भागवत संप्रदायाचा पुरस्कार करणाऱ्या तुकोबांच्या विचारधारेला मानवतावादी मूल्यांचे अधिष्ठान आहे. त्यामुळे त्यांनी आपल्या अभंगातून समाजाला केलेले आवाहन हे विशिष्ट परिस्थितीला आणि विशिष्ट काळालाच लागू न पडता ते सार्वकालिक आहे. कोणत्याही जाती धर्माचा किंवा पंथाचा मनुष्य तुकोबांची अभंगवाणी वाचताना तद्रूप होऊ शकतो. 'भेदाभेद भ्रम अमंगळ' असे ते म्हणतात, म्हणूनच आज हिंदू, मुस्लिम, ख्रिश्चन, शिख, जैन, बौद्ध अशा अनेक धर्मातील लोक वारकरी असल्याचे दिसते. आत्यंतिक त्याग आणि आत्यंतिक भोग या पराकोटीच्या टोकांचा निषेध करून आत्मसंयमाचा मार्ग त्यांनी समाजाला दाखवला. शरीर जेवढे अपवित्र आहे तेवढेच ते पवित्रही आहे कारण परब्रह्माची प्राप्ती व्हायला ते साहाय्यक ठरते, मोहाचे जाळे शरीराभोवती विणले जाते व शरीरामुळेच माणसाचे अधःपतन होते. हे खरे असले तरी याच शरीरात ईश्वराचे वास्तव्य असते हे सांगताना ते म्हणतात-
**शरीर दुःखाचे कोठार । शरीर रोगाचे भांडार। शरीर दुर्गंधीची थार। नाही अपवित्र शरीरा ऐसे ।। शरीर उत्तम चांगले। शरीर सुखाचे घोसुले । शरीर साध्य होय केले। शरीरे साधले परब्रह्म ।।**

संत तुकारामांच्या वाणीतून उपदेशाची गंगा त्यांच्या निर्वाणापर्यंत सतत बाहत होती. त्यांनी केवळ देवभक्तीच सांगितली नाही तर कौटुंबिक व सामाजिक नीतीही आग्रहाने सांगितली. अध्यात्म आणि व्यवहार, प्रारब्ध आणि प्रयत्न, भक्ती आणि कर्म यांची सांगड घालून प्रत्येक मनुष्याने आपले जीवन यशस्वी करावे, असा उपदेश त्यांनी आपल्या अभंगातून केला. त्यांचे अभंग म्हणजे सर्वसामान्य माणसाला जीवन जगण्याची प्रेरणा आहे. संत ज्ञानेश्वरांपासून सुरू झालेल्या संतचळवळीचे नेतृत्व संत तुकारामांनी समर्थपणे केले म्हणूनच संत बहिणाबाई त्यांच्याविषयी म्हणतात-
**संतकृपा झाली । इमारत फळा आली ।। ज्ञानदेवें रचिला पाया। उभारिला देवालया ।। नामा तयाचा किंकर । तेणे केला हा विस्तार ।। जनार्दन एकनाथ। खांब दिला भागवत ।। तुका झालासे कळस । भजन करा सावकाश ।।**

अशा या भागवत संप्रदायाच्या मंदिराचा कळस झालेल्या जगद्गुरू संत तुकाराम महाराजांना त्यांच्या पुण्यतिथीनिमित्त साष्टांग दंडवत.

(वरील माहिती विविध धर्मग्रंथांतून संकलीत केली आहे.)